महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०१७

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

पुणे जिल्ह्यातील म्हाळुंगे-बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा नगरीत मैदानाचा खेळापेक्षा इतर समारंभासाठी वापर केला जात असल्याबाबत

(१) १९७०० (०६-०८-२०१५). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील म्हाळुंगे-बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा नगरीत खेळापेक्षा लग्न व इतर समारंभ मोठया प्रमाणात होत असल्याचे तसेच मुंबईतही खेळांच्या मैदांनाची जागा जिमखान्यांना खेळासाठी दिलेली असतांना या ठिकाणी खेळापेक्षा खाजगी कार्यक्रमांना व लग्न समारंभासाठी देऊन मैदानाचा दुरुपयोग केला जात असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खेळांसाठी राखीव असलेली खेळाची मैदाने खेळाशिवाय अन्य कार्यक्रमासाठी देण्यात येऊ नयेत यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२७-०४-२०१७) : (१) व (२) हे खरे नाही. म्हाळुंगे बालेवाडी शिवछत्रपती क्रीडा संकुलातील मैदाने विविध क्रीडा संघटना, क्लब तसेच शासकीय व निमशासकीय विभागाच्या क्रीडा स्पर्धेकरिता प्रथम प्राधान्य देऊन उपलब्ध. करुन देण्यात येतात. लग्न व इतर समारंभासाठी मागणी असल्यास त्या कालावधीमध्ये इतरांची स्पर्धा, शिबीरे, परिसंवाद इ.करिता मैदानाची मागणी नसल्यास पाण्याच्या टाकी जवळील मोकळे मैदान, बॅडमिंटन हॉल, वेटलिफ्टिंग हॉल व बॉक्सिंग हॉल या ठिकाणीच सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. मुख्य स्टेडीयम लग्न समारंभासाठी उपलब्ध करून देण्यात येत नाही.

मुंबईत क्रीडा विभागाच्या अखत्यारित असलेल्या आझाद, क्रॉस व ओव्हल मैदानापैकी फक्त आझाद मैदान हे धार्मिक कार्यक्रमासाठीच देण्यात येते, सदर मैदानावर खाजगी कार्यक्रम व लग्न समारंभ आयोजित केले जात नाहीत. आयुक्त, बृहन्मंबई महानगरपालिका, जिल्हाधिकारी, मुंबई शहर व उपनगर यांना त्यांच्या अखत्याकरित येणाऱ्याखेळाच्या मैदानावर, जिमखान्यावर खाजगी कार्यक्रमांचे व लग्न समारंभाचे आयोजन होवू नये यासाठी तसेच त्याबाबत योग्य त्या उपाययोजना करण्याबाबत विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, मुंबई यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्ह्यातील शासकीय वसतिगृहांच्या इमारतींची कामे अपूर्ण असलेबाबत

(२) २९०८१ (२३-१२-२०१५). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील शासकीय तंत्रनिकेतन मध्ये वसतिगृहाचे शुल्क भरूनही मुलीना प्रवेश देण्यात न आल्यामुळे त्यांना खाजगी रूमचा आधार घ्यावा लागत आहे हे खरे आहे काय,

(२) तसेच अनेक इमारतींची कामे अपूर्ण आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने इमारतींची कामे पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली तसेच उक्त कामे पूर्ण करण्यास दिरंगाई करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१७-०४-२०१७) : (१) नाही.

(२) व (३) संस्थेमधील कोणत्याही इमारतीचे बांधकाम अपूर्ण नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नवीन प्राध्यापकांना संशोधनासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणा-या लघु संशोधन प्रकल्प योजनेपासून लाखो शिक्षक वंचित राहिल्याबाबत

(३) ३३३९३ (२३-१२-२०१५). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवीन प्राध्यापकांना संशोधनासाठी प्रोत्साहन देण्याच्या उददेशाने राबविण्यात येणा-या लघु संशोधन प्रकल्प योजनेपासून लाखो शिक्षक वंचित असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१५ दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याला युजीसी संकेतस्थळ कारणीभूत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेपासून वंचित राहिलेल्या शिक्षकांना लाभ मिळवून देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१३-०४-२०१७) : (१) व (२) हे खरे नाही. सदर बाब विद्यापीठ अनुदान आयोगाशी संबंधित आहे.

(३) व (४) सन २०१४-१५ मध्ये लघुसंशोधन प्रकल्पाच्या ३००५ प्रस्तावांपैकी ११६७ प्रस्ताव विषयतज्ञांमार्फत शिफारशीनुसार पात्र ठरविण्यात आलेले होते. अपात्र ठरविण्यात आलेल्या प्रस्तावामधील शिक्षक पुन्हा योजनेच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे नव्याने प्रस्ताव दाखल करु शकतात.

काही महाविद्यालयांना निधी कमतरतेमुळे / उपयोगीता प्रमाणपत्र प्राप्त न झाल्याने / पूर्वी वितरीत निधीचे खाते अंतिम न केल्यामुळे निधी वितरीत करण्यात आलेला नाही.

राज्यात दहावी बारावीच्या परीक्षेत गुणवंत ठरलेल्या विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या स्कॉलरशिपचे ऑनलाईन अर्ज भरण्याची लिंक पालिकेच्या अधिकृत वेबसाईटवर उपलब्ध नसल्याबाबत

(४) ३४२३७ (२१-०१-२०१६). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दहावी बारावीच्या परीक्षेत गुणवंत ठरलेल्या विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या स्कॉलरशिपचे ऑनलाईन अर्ज भरण्याची लिंक पालिकेच्या अधिकृत वेबसाईटवर उपलब्ध नसल्याने पालकांसह विद्यार्थ्यांचीही गैरसोय होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२१-०४-२०१७) : (१) हे खरे नाही.

"भारतरत्न मौलाना अब्दुल कलाम आझाद योजना" व "लोकशाहीर अण्णाभाऊ साठे योजना" या योजनांतर्गत अनुक्रमे रु.१५,०००/- व रु.२५,०००/- पुढील शिक्षणासाठी पुणे महानगरपालिकेमार्फत अर्थसहाय्य देण्यात येते, सदर योजनेची माहिती पुणे महानगरपालिकेच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात येते. या योजनेचे अर्ज ऑनलाईन तसेच ऑफलाईन प्रक्रियेद्वारा स्विकारण्यात येतात. सदर योजना फक्त पुणे महानगरपालिकेमध्ये राबविण्यात येते.

सदर योजनेचा लाभ घेण्याकरिता पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये रहाणारे इयत्ता १० वी व इयत्ता १२ वीचे खालील विद्यार्थी अर्ज करु शकतात :-

(१) खुल्या गटातील ८० टक्के गुण मिळविलेले विद्यार्थी.

(२) किमान ७०% गुण मिळविलेले पुणे महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थी/रात्रशाळेतील विद्यार्थी/मागासवर्गीय विद्यार्थी.

(३) किमान ६५% गुण मिळविलेले व ४० % अपंगत्व असलेले विद्यार्थी.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

अमरावती जिल्ह्यातील धर्नुविद्या नेमबाजी व ज्युडो या खेळाच्या प्रशिक्षणाची आरक्षित असलेल्या जागेचा विकास करणेबाबत

(५) ३७०७८ (२०-०१-२०१६). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) : सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील धर्नुविद्या नेमबाजी व ज्युडो या खेळाच्या प्रशिक्षण केंद्रासाठी शासनाने सन १९९८ वा त्या दरम्यान जागा आरक्षित केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या जागेवर खेळाडूंसाठी प्रशिक्षण केंद्र सुरु केले, वा करण्याचे योजिले आहे काय,
(३) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१७-०४-२०१७) :(१) होय.
(२) सद्यस्थितीत निर्णय झालेला नाही. तथापि, अमरावती विभागीय क्रीडा संकुलामध्ये धनुर्विद्या, नेमबाजी, ज्युडो या खेळाच्या अद्ययावत सुविधा निर्माण करण्यात आलेल्या असून संकुलामधील इनडोअर हॉलमध्ये ज्युडो या खेळाच्या सुविधा असून त्या ठिकाणी क्रीडा प्रबोधिनीचे खेळाडू प्रशिक्षण घेत आहेत. धनुर्विद्या या खेळाचे प्रशिक्षण ४०० मी. धावन मार्गाच्या मध्य भागातील मोकळया जागेमध्ये चालू आहे. तसेच विभागीय क्रीडा संकुलामध्ये नेमबाजी या खेळाची अद्ययावत रेंज उभारण्यात आलेली आहे. विभागीय क्रीडा संकुलामध्ये असणाऱ्या धनुर्विद्या, नेमबाजी व ज्युडो या खेळाच्या अद्ययावत सुविधांमुळे त्या ठिकाणी प्रशिक्षण केंद्र सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

हिंगोली जिल्ह्यातील शाळा व महाविद्यालयातील शुल्कनिधी प्रस्ताव पाठविण्याबाबत होत असलेले दुर्लक्ष

(६) ४१३३० (२५-०५-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.विजयकुमार गावीत (नंदुरबार), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्हा शिक्षण विभागाकडे शुल्कनिधी उपलब्ध झाला असून शाळा व महाविद्यालयांना धनादेश वाटपाची प्रक्रिया सुरु असली तरी संबंधीत प्राचार्य व मुख्याध्यापकांचे दुर्लक्ष होत असल्यामुळे दहावी- बारावीच्या सन २०१४-२०१५ च्या शैक्षणिक वर्षातील खुल्या प्रवर्गासह ओबीसी विद्यार्थ्यांचे माध्यमिक शिक्षण विभागाकडे फक्त १२६ प्रस्ताव दाखल झाले असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ओबीसी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२१-०४-२०१७) :(१) होय. हिंगोली जिल्ह्यात टंचाईग्रस्त भागातील, इयत्ता १० वी व इयत्ता १२ वीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक परिक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेअंतर्गत माहे डिसेंबर, २०१५ मध्ये एकूण १२६ प्रस्ताव प्राप्त झाले होते. तदनंतर पाठपूरावा करून एकूण २४३ प्रस्तावातील एकूण १०, ८२३ लाभार्थी विद्यार्थ्यांना दि. ३१ मार्च २०१६ पर्यंत शैक्षणिक परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती करण्यात आली आहे.
(२) व (३) पश्न उद्भवत नाही.

नाशिक येथे जागतिक योग विदयापीठाची स्थापना करण्याबाबत

(७) ४७३८७ (०५-०५-२०१६). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे जागतिक योग विदयापीठाची स्थापना करण्यात यावी अशा प्रकारची मागणी दिनांक २० जानेवारी २०१५ रोजी शासनाकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा योग विदयापीठाची स्थापना करण्याचा शासनाचा विचार आहे काय,

(३) असल्यास, या विदयापीठाची स्थापना करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१७-०४-२०१७) : (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

अनुदानपात्र घोषित प्राथमिक व माध्यमिक शाळांना अनुदान देण्यास शासनाने नकार दिल्याबाबत

(८) ५५२१६ (२२-०८-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.संजय पोतनीस (कलिना), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुदानपात्र घोषित प्राथमिक व माध्यमिक शाळांना अनुदान देण्यास शासनाने नकार दिल्याच्या निषेधार्थ दिनांक १ जून २०१६ पासून महाराष्ट्रातील नऊ विभागातील शिक्षण उपसंचालक कार्यालयासमोर धरणे आंदोलन व आमरण उपोषण तसेच दिनांक १५ जून, २०१६ पासून राज्यातील सर्व शाळा बेमुदत बंद ठेवण्याचा निर्णय विनाअनुदानित शाळा कृती समितीने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.शिक्षण मंत्रीमहोदयांनी अनुदानाकरिता आर्थिक तरतूद करण्याबाबत आदेश काढण्याच्या सूचना करुनही दोन महिने झाले तरीही शाळांना अनुदान दिलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३).असल्यास, घोषित शाळांची यादी दोन महिन्यापासून पडून आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार शासन स्तरावर काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२०-०४-२०१७) : (१) दिनांक ५ जून, २०१६ पासून बेमुदत आमरण उपोषण करण्याबाबत विनाअनुदानित शाळा कृती समितीने निवेदन दिले होते हे खरे आहे.
(२) व (३) शासन निर्णय दिनांक १ फेब्रुवारी, २०१७ अन्वये अनुदान पात्र शाळांना २० टक्के प्रमाणे अनुदान उपलब्ध करून देण्यात आले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

शहापुर (जि.ठाणे) येथील क्रीडा संकुलासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी

(९) ५७२६७ (२२-०८-२०१६). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) : सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापुर (जि.ठाणे) येथील क्रीडा संकुलासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी मा. क्रीडा व युवक कल्याण मंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ४ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१७-०४-२०१७) : (१) होय, हे खरे आहे.
(२) शहापूर तालुका क्रीडा संकुलाकरिता खर्डी येथील महसूल विभागाची जागा हस्तांतर होणेबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांना तपासून त्वरीत कार्यवाही होणेबाबत निर्देश देण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील माध्यमिक व प्राथमिक शाळेमध्ये मध्यान्ह भोजन योजने अंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या किचन शेडच्या कामासाठी निधी देण्याबाबत

(१०) ५९४३७ (१८-०८-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील माध्यमिक व प्राथमिक शाळेमध्ये मध्यान्ह भोजन योजने अंतर्गत ७२ किचन शेड मंजूर करण्यात आले आहेत, सदर ७२ मंजूर किचन शेड पैकी १५ किचन शेडचे काम पूर्ण झाले असून ठेकेदारास शासनाने निधी उपलब्ध करुन न दिल्याने देयके अदा करण्यात आलेली नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मध्यान्ह भोजन योजने अंतर्गत निधी उपलब्ध करुन न देण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, मध्यान्ह भोजन योजने अंतर्गत ७२ किचन शेडचे काम पूर्ण होण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२१-०४-२०१७) : (१), (२) व (३) सिंधुदुर्ग जिल्हयामधील शालेय पोषण आहार योजनेंतर्गत ७४ खाजगी शाळांमध्ये स्वयंपाकगृह बांधकामे मंजूर असून त्यापैकी १५ शाळांतील बांधकामांचा शासनातर्फे अदा करावयाचा निधी जिल्हास्तरावर वितरित करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर महानगरपालिकेच्या तेलगू अप्रशिक्षित शिक्षण सेवकांना खास बाब म्हणून शासन सेवेत सामावून घेणेबाबत

(११) ६१३२४ (२६-०८-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळामार्फत चालविल्या जाणाऱ्या तेलगू शाळेत विडी कामगार, यंत्रमाग कामगार, बांधकाम मजूर इ. कष्टकरी वर्गातील पालकांची मुले शिक्षण घेत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शाळेतील तेलगू अप्रशिक्षित शिक्षण सेवकांना खास बाब म्हणून शासन सेवेत सामावून घेऊन नियमित वेतनश्रेणी देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१९-०४-२०१७) :(१) राज्यातील विविध सामाजिक घटकातील मुले स्थानिक स्वराज्य संस्थांतंर्गत शाळांमध्ये शिक्षण घेतात हे खरे आहे.
(२) सदर शिक्षण सेवकांचा तीन वर्षाचा विहीत कालावधी पूर्ण होत असल्याची खात्री करून त्यांना नियमित शिक्षकांची वेतनश्रेणी विहित अटी व शर्तीच्या अधीन राहून देण्याबाबतच्या सूचना प्रशासन अधिकारी, सोलापूर महानगरपालिका यांना दि. २७/०९/२०१६ च्या शासन पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

बंजारा समाजाचे संत श्री.सेवालाल महाराज यांचे जीवन चरित्रचे शालेय पाठ्यपुस्तकात समावेश करण्याबाबत

(१२) ६१९६८ (२२-०८-२०१६). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बंजारा समाजाचे संत श्री.सेवालाल महाराज यांचे जीवन चरित्र शालेय पाठ्यपुस्तकात समावेश करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (मुर्तिजापूर) यांनी मा.शालेय शिक्षण मंत्री यांना दिनांक २० मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीनुसार शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२०-०४-२०१७) : (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

यवतमाळ जिल्ह्यातील शाळांना एप्रिल ते सप्टेंबर, २०१६ अखेर शालेय पोषण आहाराचे अनुदान न मिळाल्याबाबत

(१३) ६५१२६ (०५-०१-२०१७). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील शाळांना एप्रिल ते सप्टेंबर, २०१६ अखेर शासनाकडून अनुदान न मिळाल्याने तसेच पोषण आहाराचे अनुदान देण्याबाबत शासनाचे होणारे दुर्लक्ष, पोषण आहार दररोज देण्याची सक्ती, यामुळे मुख्याध्यापकांना गावतल्या दुकानदारांकडून उधारीवर धान्य व इतर साहित्य आणून पोषण आहार द्यावा लागत असल्याची बाब माहे, सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोषण आहार शिजविणारा स्वयंपाकी, मदतनीस यांना दिले जाणारे मासिक १ हजार रुपयांचे मानधनही देण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास अशा उधारीवर घेण्यात आलेल्या आहाराची माहिती शासनाला ऑनलाईन द्यावी लागते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गत सहा महिन्यापासून अनुदान न देण्याची कारणे काय आहेत तसेच अनुदान तातडीने देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१९-०४-२०१७) : (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) यवतमाळ जिल्ह्यात शालेय पोषण आहार योजनेंतर्गत माहे डिसेंबर, २०१६ पर्यंतची देयके अदा करण्यात आली असून माहे फेब्रुवारी, २०१७ पर्यंतची देयके अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील 'केजी टू पीजी' शिक्षणाच्या गैरकारभाराविरुद्ध

(१४) ६५२७७ (०५-०१-२०१७). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), डॉ.राहूल पाटील (परभणी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील 'केजी टू पीजी' शिक्षणाच्या गैरकारभाराविरुद्ध युवासेनेच्या वतीने दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास मुंबईतील गिरगाव चौपाटीजवळील विल्सन महाविद्यालयापासून ते मरीनलाईन्स पर्यंत मोर्चा काढण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोर्चातील युवासेनेच्या मागण्याचे स्वरूप काय आहे व त्यानुषंगाने या मागण्या संदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२०-०४-२०१७) : (१) अशा आशयाचे वृत्त प्रसार-माध्यमाद्वारे निदर्शनास आले.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील दसरा मैदान येथे तालुका क्रीडा संकुल उभारण्याबाबत

(१५) ६५४९६ (१६-१२-२०१६). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) : सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील दसरा मैदान येथे तालुका क्रीडा संकुल उभारण्याबाबत मा.पालकमंत्री ठाणे जिल्हा यांचे दालनात दिनांक ११ जुलै, २०१६ रोजी वा त्यासुमारास शासकीय अधिकारी व लोकप्रतिनिधी यांची बैठक घेण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बैठकीत कोणता निर्णय घेण्यात आला आहे,
(३) असल्यास, शासनाने उक्त निर्णयानुसार उल्हासनगर येथे तालुका क्रीडा संकुल उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१७-०४-२०१७) : (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर बैठकीमध्ये तालुका क्रीडा संकुलासाठी दसरा मैदान येथे उपलब्ध असलेल्या जागेवर तसेच उल्हासनगर अन्य भागात संकुलासाठी जागा प्राप्त झाल्यास तेथेही क्रीडा सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात असे सुचविण्यात आले. तसेच शासन निर्णय दिनांक २९.०२.२०१६ नुसार तालुका क्रीडा संकुल समितीची नोंदणी तात्काळ करुन जिल्हाधिकारी यांनी समितीस जागा हस्तांतरीत करण्याची कार्यवाही करावी असे सुचविण्यात आले आहे.
(३) शासन निर्णय दिनांक २९.०२.२०१६ नुसार संकुल समितीच्या पुनर्रचनेची कार्यवाही करण्यात आलेली असून संकुलाच्या जागा हस्तांतरणाची कार्यवाही महसूल विभागाकडून करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित पात्र माध्यमिक, प्राथमिक शाळांना व तुकड्यांना २०% अनुदान देण्याचा शासनाचा निर्णय

(१६) ६५५२४ (०५-०१-२०१७). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी),

श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विनाअनुदानित शाळांना २० टक्के अनुदान देण्याचा शासनाने शासन निर्णय काढला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूरसह राज्यातील एकूण किती शाळेतील व तुकडीतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वरील निर्णयाचा फायदा मिळणार आहे तसेच शासनाने या आदेशात बायोमेट्रिक, सरल आणि मुख्य म्हणजे इयत्ता नववी व दहावीच्या १०० टक्के निकाल असावा या जाचक अटी घातल्याने अनेक शाळा अनुदानापासून वंचित राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास विनाअनुदानित शाळांना २० टक्के अनुदान देण्यासंदर्भात निर्णय घेऊनही शिक्षण विभाग व शाळा संस्थाचालक यांच्यातील वादामुळे राज्यातील विना अनुदान शाळांना अनुदान मिळत नसल्यामुळे आपले आणि कुटूंबाचे जगणे मुश्कील झालेल्या नाशिकच्या नूतन प्राथमिक विद्यामंदिर या शाळेतील एका शिक्षकांने दिनांक २५ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास गळफास लावून आत्महत्या केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात काढण्यात आलेल्या शासन निर्णयामधील जाचक अटीमुळे अनुदान मिळणे, मुश्कील झाल्याने, सदर अटी मागे घेण्याबाबतची मागणी विनाअनुदानित शाळा कृती समितीने शासनाकडे केली असून, शासनाने विनाअनुदानीत शाळांसाठी, काढलेल्या २० टक्के अनुदानाबाबतच्या, अध्यादेशा विरुध्द दिनांक ०२ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास राज्यभरात, ३५,००० शाळांमधील २०,००० शिक्षकांच्या, महाराष्ट्र राज्य कायम विनाअनुदानीत शाळा कृती समितीने, राज्यभर धरणे आंदोलन करण्याचा निर्णय घेतला, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, या शासन निर्णयाला होणारा विरोध लक्षात घेता त्यातील जाचक अटी रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२०-०४-२०१७) : (१) होय.

(२) सोलापूरसह राज्यातील १६२८ शाळा व २४५२ वर्ग तुकड्यांवरील १९,२४७ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सरसकट २० टक्के अनुदान विहित अटी व शर्तीच्या अधिन राहून शासन निर्णय दिनांक १ फेब्रुवारी, २०१७ अन्वये उपलब्ध करून देण्यात आले आहे.

(३) नाही.

(४) होय.

(५) शासनाच्या मते अटी जाचक नाहीत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची खोटी प्रमाणपत्रे सादर करून मान्यता घेतलेल्या प्राचार्यांना राज्यातील कोणत्याही विद्यापीठाच्या समितीवर न घेण्याच्या निर्णयाबाबत

(१७) ६५५८६ (१६-१२-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.विलासराव जगताप (जत), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी खोटी प्रतिज्ञापत्रे सादर करून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची मान्यता घेतलेल्या प्राचार्यांना राज्यातील कोणत्याही विद्यापीठाच्या समितीवर घेऊ नये असे आदेश असतानाही अनेक प्राचार्यांची विद्यापीठ समितीवर नेमणूक झाल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्राचार्यांवर तंत्रशिक्षण संचालकांनी कोणतीही चौकशी अथवा गुन्हे दाखल न केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाला अशा प्रकारची खोटी प्रतिज्ञापत्रे सादर करून महाविद्यालयांची फी वाढवून तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या फी प्रतिपूर्ती अंतर्गत कोट्यावधी रुपयांचा अपहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी संपूर्ण महाविद्यालये व प्राचार्यांची चौकशी केली आहे काय व त्या नुसार संबंधित अधिकाऱ्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

श्री. विनोद तावडे (२५-०४-२०१७) : (१) नाही.

(२) विद्यापीठ समितीवर प्राचार्यांच्या नियुक्तीची बाब ही संबंधित विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील असल्याने संचालक, तंत्र शिक्षण यांच्याकडून कोणतीही चौकशी अथवा गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) शुल्क नियामक प्राधिकरण व सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाकडून प्राप्त माहितीनुसार राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेंतर्गत मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या फी प्रतिपूर्तीअंतर्गत अपहार केल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई विभागातील महाविद्याल्यांकडून अकरावी ऑनलईन प्रवेशासाठी अधिक रक्कम घेण्यात आल्याबाबत

(१८) ६५६४८ (०५-०१-२०१७). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विभागातील अनेक महाविद्यालये अकरावी ऑनलाईन प्रवेशासाठी विद्यार्थ्यांकडून ठरलेल्या शुल्काहून अधिक रक्कम घेऊन त्यांची आर्थिक फसवणूक करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बहुतांश विद्यार्थी व पालक प्रवेश बदलाचा आग्रह करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार अशा प्रकारे विद्यार्थांची फसवणुक करणाऱ्या महाविद्यालयांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२७-०४-२०१७) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे येथील, सावित्रीबाई फुले विद्यापीठ व्यवस्थापनाच्या चौकशीबाबत

(१९) ६५६८६ (१६-१२-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील, सावित्रीबाई फुले विद्यापीठ व्यवस्थापनाने, अभियांत्रिकी शाखेच्या विद्यार्थांना, उत्तीर्ण करण्यासाठी नियमाचे उल्लंघन करुन मर्यादेपेक्षा जास्त ग्रेस गुण दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, उक्त विद्यापीठाच्या केमिस्ट्री विभागातील युजीसी-बीएसआर फेलोशिपच्या निवड प्रक्रियेवर विद्यापीठाच्या चौकशी समितीने आक्षेप नोंदविला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्नोक्त भाग (१) व (२) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार दोषी असणाऱ्यां विरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१३-०४-२०१७) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या केमिस्ट्री विभागातील युजीसी-बीएसआर फेलोशिपच्या निवड प्रक्रियेवर विद्यापीठाच्या चौकशी समितीने आक्षेप नोंदविला नसून निरीक्षणे नोंदविली आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

विद्यापीठाकडून मोफत बस प्रवास योजना न मिळाल्यामुळे मुलींना प्रवास सवलती पासून वंचित राहावे लागत असल्याबाबत

(२०) ६५७२३ (१६-१२-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), डॉ.आशिष देशमुख (काटोल) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या अंतर्गत येणाऱ्या विविध महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तरपर्यंत शिक्षणासाठी विद्यापीठाकडून मोफत बस प्रवास योजना न मिळाल्यामुळे हजारो मुलींना प्रवास सवलती पासून वंचित राहावे लागले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेची अंमलबजावणी होण्याचे सर्वाधिकार विद्यापीठांना दिले असून सदर योजनेची अंमलबजावणी विद्यापीठाच्या स्तरावरूनच केली जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुलींना बसचा मोफत प्रवास उपलब्ध करून देण्याची योजनेविषयक माहिती महाविद्यालयाने व विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागाने न दिल्यामुळे विद्यार्थींना प्रवास सवलतीपासून वंचित रहावे लागले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून मोफत प्रवास योजनेतून वंचित ठेवणाऱ्या संबंधित महाविद्यालय व विद्यार्थी कल्याण विभागावर कोणती कारवाई केली वा करीत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१७-०४-२०१७) : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

दादर (मुंबई) येथील बालमोहन विद्यामंदिरने शाळेपासुनच्या अंतराचे कारण देत मुलांना प्रवेश नाकारले असल्याबाबत

(२१) ६५७२४ (०५-०१-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादर (मुंबई) येथील बालमोहन विद्यामंदिरने शिक्षण हक्क कायद्यानुसार २५ टक्के कोट्याच्या तरतुदीप्रमाणे मुलांना शिशुवर्गात प्रवेशाचा हक्क मिळालेला असतानाही केवळ शाळेपासून दूर राहतात या कारणावरून शिशुवर्गातील मुलांना प्रवेश नाकारले असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, व तदनुसार केवळ शाळेपासुनच्या अंतराच्या कारणावरून प्रवेश नाकारणाऱ्या बालमोहन विद्यामंदिर या शाळेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२४-०४-२०१७) : (१) हे खरे आहे
(२) शिक्षण हक्क कायद्यानुसार २५ % आरक्षणांतर्गत निश्चित केलेल्या बालकांचे प्रवेश नियमित करण्यबाबत शाळा प्रशासनास वेळोवेळी कळविण्यात आले आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील भाषिक व धार्मिक अल्पसंख्यांकांच्या पदव्युत्तर कायदा अभ्यासक्रमामध्ये विनाअनुदानित संस्थेच्या गुणवत्ता यादीत समावेश करण्याबाबत

(२२) ६५८०४ (१६-१२-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विशेषतः मुंबई महानगरपालिकाक्षेत्रातील भाषिक व धार्मिक अल्पसंख्यांकांच्या पदव्युत्तर कायदा अभ्यासक्रमामध्ये विनाअनुदानित संस्थेच्या गुणवत्ता यादीत प्राधान्याने समावेश तसेच केंद्रीभूत पात्रता निकषानुसार प्रवेश मंजुर होण्या संदर्भातील तफावती दूर करण्याबाबतची मागणी संबंधित विद्यार्थी संघटना, विधिविधान शाखेने तसेच त्यांचे पाल्य-पालक, जनप्रतिनिधी यांनी दिनांक २० सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास संबंधित उच्च शिक्षण व विधी व न्याय विभागाकडे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने प्रश्नोक्त बाब (१) च्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१७-०४-२०१७) : (१) हे खरे नाही.
मुंबई विद्यापीठांतर्गत विधी विभाग (एलएलएम) पदव्युत्तर अभ्यासक्रम हा अनुदान तत्वावर आहे. मुंबई विद्यापीठाच्या विधी विभागाच्या व्यतिरिक्त इतर कुठल्याही अनुदानित अथवा विना अनुदानित संस्थेत एलएलएम पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकविला जात नाही. दिनांक २० सप्टेंबर, २०१६ रोजीचे निवेदनाद्वारे कोणत्याही विद्यार्थी संघटना, विधी विधान शाखेने तसेच पाल्य-पालक, जनप्रतिनिधीद्वारे मुंबई विद्यापीठ व विधी व न्याय विभाग यांच्याकडे तक्रार प्राप्त झालेली नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शिक्षण शुल्क कायदा रद्द करण्याबाबत

(२३) ६६३५० (०५-०१-२०१७). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.किसन कथोरे (मुरबाड), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षण शुल्क कायदा रद्द करण्यासाठी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास जिल्हानिहाय शिक्षण अधिकाऱ्यांना घेराव घातल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व तद्नुसार शिक्षण शुल्क कायदा रद्द करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२७-०४-२०१७) : (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील अनेक रात्रशाळांमध्ये शैक्षणिक दर्जा उंचविण्यासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांचा अभाव असल्याबाबत

(२४) ६६३५६ (०५-०१-२०१७). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक रात्रशाळांमध्ये शैक्षणिक दर्जा उंचविण्यासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधां तसेच प्रयोगशाळा, संगणक कक्ष व पुस्तकांचा अभाव असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मुंबई सह राज्यभरात १३७ रात्र शाळा सुरु असून, ह्या शाळांमध्ये साधारणपणे १४ हजार ५०० विद्यार्थी शिक्षण घेत असून, नोकरी करून शिकणाऱ्या तसेच अर्धवट राहिलेले शिक्षण पूर्ण करण्याची जिद्द बाळगणाऱ्यासाठी हक्काची शिक्षण संस्था असलेल्या रात्र शाळांमध्ये वेगवेगळे निकष, शाळांचे कमी तास/संचमान्यता लावल्यामुळे रात्रशाळा अडचणी आल्याचे दिनांक १५ ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व तदनुसार रात्रशाळांना वेगळे निकष लावून प्रोत्साहन देण्याकरिता तसेच आवश्यक त्या मुलभूत सूविधां उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१९-०४-२०१७) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) राज्यातील रात्रशाळांचे विविध प्रश्न सोडविण्याबाबत दि.१.८.२०१६ रोजी घेण्यात आलेल्या बैठकीत रात्रशाळेची संचमान्यता, विद्यार्थ्यांना पाठयपुस्तके पुरविणे, शालेय पोषण आहार, रात्रशाळेत बायोमेट्रीक प्रणाली सुरु करणे इत्यादी विविध मुद्यांवर निर्णय घेण्यात आलेला असून त्यानुसार कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना दि.२७.९.२०१६ च्या पत्रानुसार संबंधित प्राधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर शहरात बॅटमिंटन सरावासाठी आवश्यक कोर्टच उपलब्ध नसल्याबाबत

(२५) ६६६६९ (१६-१२-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) : सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर शहरात २५० हून अधिक बॅटमिंटन खेळाडू असून त्यांना सरावासाठी आवश्यक कोर्ट उपलब्ध नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच कोल्हापूर शहरात एकूण २२ कोर्टस् उपलब्ध आहेत त्यापैकी महापालिकेची १४ कोर्टस् असून त्यामध्ये खेळाडूंना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार या खेळाडूंना सर्व सोयी सुविधायुक्त बॅटमिटन कोर्ट उपलब्ध करुन देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१७-०४-२०१७) : (१) हे खरे नाही.
(२) कोल्हापूर शहरात उपलब्ध असलेली बॅडमिंटन कोर्ट महानगरपालिका व शैक्षणिक संस्थेच्या मालकीची / अखत्यारितील आहेत. यामध्ये खेळाडूंना आवश्यक सुविधा संबंधित संस्थामार्फत पुरविल्या जातात.
(३) याबाबत जिल्हा क्रीडा अधिकारी अथवा क्रीडा संचालनालयाकडे कोणताही लेखी अर्ज / निवेदन प्राप्त झालेले नाही. तथापि, कोल्हापूर विभागीय क्रीडा संकुलाच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये इनडोअर हॉल (बॅडमिंटन कोर्ट) बांधकाम प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

(ता.माणगांव, जि.रायगड) लोणेरे येथील डॉ.बासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठातंर्गत इन्स्टिटयुट ऑफ पेट्रोकेमिकल इंजिअिरिंग या विद्यापीठात पूर्णवेळ कुलगुरु नसल्याबाबत

(२६) ६६७०६ (१६-१२-२०१६). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणेरे (ता.माणगांव, जि.रायगड) येथील जागतिक किर्तीचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठातंर्गत इन्स्टिटयुट ऑफ पेट्रोकेमिकल इंजिअिरिंग या विद्यापीठात पूर्णवेळ कुलगुरु नसल्याने व प्रशासनाचे नियंत्रण ढासळल्याने विद्यार्थ्यांचे प्रचंड शैक्षणिक व आर्थिक नुकसान होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने विद्यापीठात चाललेल्या मनमानी कारभाराबाबत चौकशी केली आहे काय व तदनुसार यास जबाबदार असणा-या व्यक्तीवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०१-०४-२०१७) : (१) हे खरे नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठांतर्गत इन्स्टिटयूट ऑफ पेट्रोकेमिकल इंजिनिअरिंग असे विद्यापिठ नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापिठ हे लोणेरे (ता.माणगांव, जि.रायगड) येथे असुन शासनाने दिनांक १ मार्च २०१६ रोजीच्या आदेशानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू म्हणून डॉ. वि. ग. गायकर यांची नियुक्ती केली आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

नेवासे (जि.अहमदनगर) तालुक्यातीलसुमारे ११८ तर जिल्ह्यातील १७९० शाळांना पुस्तके न मिळाल्या बाबत

(२७) ६६९०८ (०५-०१-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवासे (जि.अहमदनगर) तालुक्यातील सुमारे ११८ तर जिल्ह्यातील सुमारे १७९० शाळांना माहे ऑगस्ट, २०१६ उलटून गेला तरी पुस्तके मिळाली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुसार पुस्तके दरवर्षी वेळेवर उपलब्ध होणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२१-०४-२०१७) : (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर येथील एसएससी बोर्डाच्या बंगले व इमारती धूळ खात पडलेबाबत

(२८) ६७१८५ (०५-०१-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथे राजेन्द्रनगर पासून हाकेच्या अंतरावर एसएससी बोर्डाचा विस्तार झालेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बदलीहून येणाऱ्या अधिकाऱ्यांची गैरसोय होवू नये याकरिता कर्मचाऱ्यांसह अधिकार्यांसाठी लाखो रुपये खर्च करून निवासस्थाने बांधली गेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवासस्थानामध्ये कोणतेही अधिकारी राहत नसल्याने अनेक वर्षे धूळ खात पडले असून, इमारतींची व बंगल्यांची पडझड झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२७-०४-२०१७) : (१), (२), व (३) अंशत: खरे आहे.

(४) इमारत दुरस्ती आणि रंगरंगोटी इ.बाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना पुस्तक पिढी योजनेतून पुस्तक उपलब्ध करुन देण्याबाबत

(२९) ६७२८७ (०५-०१-२०१७). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ९ वी १० वी च्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शासनाकडून माध्यमिक पुस्तक पेढी योजना राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यभरातून या योजनेअंतर्गत ४ लाख ८३ हजार विद्यार्थ्यांनी पुस्तकांची मागणी केलेली असताना प्रत्यक्षात ४५ हजार १५८ पुस्तक संचांचा पुरवठा झाला असल्याचे दिनांक २५ जुलै, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षण संचालकांनी मागणी केलेल्या २५ टक्के मुलांना अनुदानाच्या उपलब्धतेनुसार पुस्तके देण्याचा निर्णय घेतला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना पुस्तक पेढी योजनेतून पुस्तक उपलब्ध करुन देण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२७-०४-२०१७) : (१) होय. मान्यताप्राप्त व अनुदानप्राप्त माध्यमिक शाळांतील इ.९ वी व १० वी मधील एकूण विद्यार्थी संख्येच्या २५ टक्के मर्यादेत विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके परतफेडीच्या तत्वावर उपलब्ध करुन दिली जातात.

(२) व (३) होय.
(४) मागासवर्गीय विद्यार्थ्यांना माध्यमिक पुस्तकपेढी योजनेतून पुस्तके उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे महापालिकेच्या शालेय पोषण आहार योजनेतील तांदळाची बेकायदा विक्री होत असल्याबाबत

(३०) ६७३२१ (०५-०१-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महापालिकेच्या शालेय पोषण आहार योजनेतील तांदळाची बेकायदा विक्री होत असल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तांदूळ शिजवून तो मुलांना देण्याचे काम महिला बचत गटाकडे दिले असतांनाही हा तांदूळ खासगी दुकानात विक्रीस पाठविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१९-०४-२०१७) : (१) व (२) हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून दोषी बचत गटांविरुध्द पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच, सदर दोषी बचत गटांकडून आहार वाटपाचे काम काढून घेण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे, बालचित्रवाणीतील कार्यक्रमांच्या ध्वनिचित्रफिती (टेप) चे वेळेवर डीजीटायझेशन झाले नसल्याबाबत

(३१) ६७३६४ (०५-०१-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे, बालचित्रवाणीतील चार हजार कार्यक्रमांच्या ध्वनिचित्रफिती (टेप) चे वेळेवर डीजीटायझेशन झाले नसल्याने त्यातील २५० टेप बुरशीमुळे उध्वस्त होण्याच्या मार्गावर असल्याचे माहे, सप्टेंबर २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त टेप मध्ये मुलांचे भावविश्व, समृद्ध करणारे गणित, इतिहास, विज्ञान, खगोलशास्त्र सह अनेक विषयांच्या पाठ्यक्रमावरील कार्यक्रम, तज्ञांच्या मुलाखतींचा समावेश असल्याचे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने प्रश्नोक्त भाग (१) बाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२१-०४-२०१७) :(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात शालेय शिक्षण विभागाने रात्रशाळा ऐवजी मुक्त शाळा सुरु करणेबाबत केलेली शिफारस

(३२) ६७६०३ (०५-०१-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शालेय शिक्षण विभागाने माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान नव्या शिक्षण धोरणाचा मसूदा जाहिर केला होता, या मसुद्यात रात्रशाळा ऐवजी मुक्त शाळेची शिफारस करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मसुदेतील स्वरुप काय होते, तसेच मसुदा अंतिम करण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२७-०४-२०१७) : (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई विद्यापीठाने २५ टक्के फीवाढीचा प्रस्ताव तयार केला असल्याबाबत

(३३) ६७८४६ (१६-१२-२०१६). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयांनी मागणी केल्यामुळे विद्यापीठाने २५ टक्के फीवाढीचा प्रस्ताव तयार केला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनेक गोरगरीब विद्यार्थ्यांवर वाढत्या महागाईमुळे उच्च शिक्षणाची संधी गमाविण्याची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या विरोधात फोर्ट कॅम्पसमध्ये काही विद्यार्थी संघटनांनी निदर्शने केली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने या शुल्कवाढीला विद्यार्थ्यांचा असलेला विरोध लक्षात घेता सदर शुल्कवाढीचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१३-०४-२०१७) : (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) हे खरे नाही.
(४) याबाबत शासनाकडे कोणताही प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

अमरावती शहरातील महापालिकेच्या व जिल्ह्यात परिषदेच्या शाळेत विद्यार्थ्यांसाठी असलेल्या पोषण आहारात झालेला गैरव्यवहार

(३४) ६७९८२ (०५-०१-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती शहरात महापालिकेच्या १२५ शाळा तर जिल्ह्यात परिषदेच्या ४०० पेक्षा अधिक प्राथमिक शाळा असून या शाळांत विद्यार्थ्यांसाठी देण्यात येत असलेल्या पोषण आहारात गैरव्यवहार होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने या योजनेचे ऑडिट करून दोषी शाळांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१९-०४-२०१७) : (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

नांदेड जिल्हा परिषदेअंतर्गत पहिली ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना पाठयपुस्तके वितरणास होत असलेला विलंब

(३५) ६८१८८ (०६-०१-२०१७). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हा परिषदेअंतर्गत पहिली ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना दिनांक १० जून, २०१६ पुर्वी क्रमिक पुस्तके मिळण्यास दोन महिने लागू नयेत असा सक्त आदेश असतानाही शिक्षण विभागातील पाठ्यपुस्तक वितरण विभागाच्या बेजबाबदारपणाच्या कारभारामुळे विद्यार्थ्यांना पुस्तके मिळण्यास विलंब झाला असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पुस्तक वितरणातून खासगी विना अनुदानीत शाळांना वगळल्याने पालकांचा संताप व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रश्नोक्त भाग १ व २ नुसार शासनाने येथील जिल्हा परिषद शाळांसह विनाअनुदानीत शाळांतील विद्यार्थ्यांना निर्धारित वेळेत पुस्तके वितरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१९-०४-२०१७) : (१) नांदेड जिल्हयातील पात्र विद्यार्थ्यांपैकी ९६.८ टक्के विद्यार्थ्यांना शाळा सुरु होण्याच्या पहिल्याच दिवशी पाठयपुस्तकांचे वितरण करण्यात आले असून उर्वरित विद्यार्थ्यांना शाळा सुरु झाल्यापासून ८ दिवसांनतर पाठयपुस्तकांचे वितरण करण्यात आले आहे.
(२) केंद्र पुरस्कृत सर्व शिक्षा अभियानांतर्गत मोफत पाठयपुस्तक योजनेचा लाभ राज्यातील शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा आणि अनुदानित शाळा यामधील इ. १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना दिला जातो. विना अनुदानित शाळांना सदर योजना लागू नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

शहापूर (जि.ठाणे) येथील क्रीडा संकुलासाठी निधी उपलब्ध करून देण्याच्या मागणीबाबत

(३६) ६९२२८ (१६-१२-२०१६). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) : सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि.ठाणे) येथील क्रिडा संकुलासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी मा. क्रिडा व युवकल्याण मंत्री, यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ४ मे २०१६ रोजी वा सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१७-०४-२०१७) : (१) होय, हे खरे आहे.
(२) शहापूर तालुका क्रीडा संकुलाकरिता खर्डी येथील महसूल विभागाची जागा हस्तांतर होणेबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांना तपासून त्वरीत कार्यवाही होणेबाबत निर्देश देण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे विद्यापीठातील अभियांत्रिकी परिक्षेमध्ये झालेला गैरप्रकार

(३७) ७००२२ (१६-१२-२०१६). श्री.नारायण पाटील (करमाळा) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे विद्यापीठाच्या परिक्षा विभागाने घेतलेल्या अभियांत्रिकी या एकाच अभियांत्रिकी परिक्षांमधील विद्यार्थ्यांना पास आणि नापास अशा दोन्ही गुणपत्रिका पाठविल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे विद्यापीठातील या अभियांत्रिकी परिक्षेमध्ये झालेल्या गैरप्रकाराची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसारअभियांत्रिकी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१३-०४-२०१७) : (१) हे खरे आहे.
(२) पुणे इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी, धनकवडी, पुणे या महाविद्यालयातील विद्यार्थी श्री.बैरागी चिंतामण दत्तात्रय याचा क्रमांक PRN महाविद्यालयामार्फत अपुरा भरल्याने सुरुवातीस त्याचा निकाल हा Fail ATKT असा जाहीर करण्यात आला होता. तथापि महाविद्यालयामार्फत आवश्यक माहिती मागवून घेण्यात येवून त्यांचा सुधारित निकाल हा 'उच्च द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण' असा जाहीर करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

आमगांव (जि.गोंदिया) येथील शाळेत पुरविण्यात येणाऱ्या मध्यान्ह शालेय पोषण आहरात गैरप्रकार करीत असल्याबाबत

(३८) ७०२९७ (०५-०१-२०१७). श्री.संजय पुराम (आमगाव) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आमगावं (जि.गोंदिया) येथील १ ली ते ७ व ८ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी खाजगी-शासकीय, प्राथमिक-माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मध्यान्ह शालेय पोषण आहार पुरविण्यासाठी लागणाऱ्या साहित्याची व शालेय पोषण आहाराची नोंद, स्टॉक नोंदवहीत केली जात नसल्यामुळे पोषण आहारात गैरप्रकार झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ वा दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची आहार वाटप एजन्सी, केंद्रप्रमुख, गटशिक्षणाधिकारी, मुख्यध्यापक व संबंधितांची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१९-०४-२०१७) : (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

नेवासा (जि.अहमदनगर) येथील क्रीडासंकुलाबाबत

(३९) ७०३६२ (१६-१२-२०१६). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) : सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवासा (जि.अहमदनगर) येथील क्रीडासंकुलाचे काम अपूर्ण अवस्थेत असून गत १० वर्षात सदर काम पूर्ण होऊ शकले नाही परिणामी तेथे पडकी इमारत असून झाडी झुडपेही वाढलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त क्रीडासंकुल केंद्र शासनाच्या "खेलो इंडिया खेलो" योजने अंतर्गत करणार असल्याची योजना आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या बाबत निश्चित कालबद्ध कार्यक्रम तयार केला अथवा वा करण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१७-०४-२०१७) : (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. तालुका क्रीडा संकुल निर्मिती योजना केंद्र शासनाच्या "खेलो इंडिया खेलो" योजनेंतर्गत नसून राज्य शासनाच्या "महाराष्ट्र स्पोर्टस् इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट प्लॅन" अंतर्गत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील विना अनुदानित शाळांना अनुदान देण्याच्या मागणीसाठी उपोषणाला बसलेल्या एका शिक्षकाचा जाकराबाद (जि.जालना) येथे मृत्यू झाल्याबाबत

(४०) ७०९५५ (०५-०१-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विना अनुदानित शाळांना अनुदान देण्याच्या मागणीसाठी उपोषणाला बसलेल्या एका शिक्षकाचा जाकराबाद (जि.जालना) येथे मृत्यू झाला असल्याचे माहे जून, २०१६ मधे वा त्यादरमान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करून या शिक्षकाचा कुटूंबाला अर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. विनोद तावडे (२०-०४-२०१७) : (१) उपोषणकर्त्या शिक्षकांपैकी जालना जिल्हयातील जाफराबाद येथील समर्थ विद्यालयातील शिक्षकाचा उपोषणानंतर घरी गेल्यावर हृदयविकाराचा झटका येऊन मृत्यु झालेला आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील विद्यापीठाशी संलग्नित वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये संगणकशास्त्र विषय शिकविणा-या शिक्षकाच्या वेतन निश्चीतीबाबत

(४१) ७१२७८ (१६-१२-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यापीठाशी संलग्नित वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये विज्ञान शाखेंतर्गत संगणकशास्त्र या ऐच्छिक विषय शिकविणा-या शिक्षकांच्या वेतन निश्चीतीबाबत स्थानिक लोकप्रतिनीधी अचलपूर यांनी दिनांक २० जुलै, २०१६ रोजी वा त्या सुमारास प्रधान सचिव उच्च व तंत्र शिक्षण यांचेकडे लेखी पत्र देवून मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिक्षकांच्या वेतन निश्चितीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०५-०४-२०१७) : (१) होय.

(२) कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

शिक्षकांना जानेवारी २०१७ पासून विद्यार्थ्यांचे दहाजणांचे गट करून त्यांच्यासोबत सेल्फी घेऊन तो फोटो सरल प्रणालीला अपलोड करण्याचे आदेशाबाबत

(४२) ७२००५ (०५-०१-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.नसीम खान (चांदिवली) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने शिक्षकांना माहे जानेवारी, २०१७ पासून विद्यार्थ्यांचे दहाजणांचे गट करून त्यांच्यासोबत सेल्फी घेऊन तो फोटो सरल प्रणालीला अपलोड करण्याचे आदेश काढले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शालाबाह्य विद्यार्थ्यांना पकडण्यासाठी विद्यार्थ्यांच्या सोबत सेल्फी घेण्याचा आदेश देणाऱ्या शासन निर्णयाला शिक्षकांनी विरोध दर्शविला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उपरोक्त निर्णयाबाबत आपली भुमिका स्पष्ट करून त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२०-०४-२०१७) : (१) होय.
(२) व (३) होय. शासनाच्या दिनांक ११ जानेवारी, २०१७ च्या परिपत्रकान्वये सेल्फीच्या निर्णयास तूर्त स्थगिती देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

उमरगा (जि.उस्मानाबाद) येथे पोली विद्यापीठ स्थापन करणेबाबत

(४३) ७२२६० (१६-१२-२०१६). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरगा (जि.उस्मानाबाद) येथे पोली विद्यापीठ स्थापन करणेबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १४ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे विनंती केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने उक्त विद्यापीठ स्थापन करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१७-०४-२०१७) : (१) होय.
(२) संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे कडून सविस्तर प्रस्ताव/अहवाल मागविण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

जिल्हा परिषद शाळांत पाठ्यपुस्तकाचा तुटवडा होत असल्याबाबत

(४४) ७२३४२ (०६-०१-२०१७). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा परिषद शाळांत पाठ्यपुस्तकाचा तुटवडा होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ च्या तिस-या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार जिल्हा परिषद शाळांत पाठ्यपुस्तकांचा पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१९-०४-२०१७) : (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई विद्यापीठामार्फत घेण्यात येणाऱ्या एलएलएम (LLM) अभ्यासक्रमाचे सर्व विषंयाचे अद्ययन साहित्य मराठी भाषेमध्ये उपलब्ध करण्यात आले नसल्याबाबत

(४५) ७२५६४ (१६-१२-२०१६). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठामार्फत घेण्यात येणा-या एलएलएम (LLM) अभ्यासक्रमाचे सर्व विषंयाचे अद्ययन साहित्य मराठी भाषेमध्ये उपलब्ध करण्यात आले नसल्याचे माहे एप्रिल, २०१६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एलएलएमसाठी एंट्रन्स (Entrace) परिक्षा सन २०१६-१७ च्या अभ्यासक्रमात प्रस्तावित करण्यात आले असून तद्नुषंगिक एलएलएम अभ्यासक्रमात प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांची संख्या मर्यादित असून Entrance परिक्षेचा पेपरही इंग्रजी घेण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने मुंबई विद्यापीठामध्ये घेण्यात येणाऱ्या एलएलएम (LLM) अभ्यासक्रमाचे अध्ययन साहित्य मराठी भाषेमधून उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच Entrance परिक्षा एलएलएम विद्यार्थ्यांना लागू न करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१३-०४-२०१७) : (१) व (२) होय. हे खरे आहे.

(३) मुंबई विद्यापीठामार्फत एलएलएम अभ्यासक्रमाचे सर्व विषयांचे साहित्य मराठी भाषेमध्ये उपलब्ध करण्यासाठी श्री. एन. एन. राजाध्यक्ष, प्राचार्य, न्यू लॉ कॉलेज, माटूंगा यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आलेली आहे. समिती यासंदर्भात कार्यवाही व विचार विनीमय करीत आहे. तसेच एलएलएम अभ्यासक्रमात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मुंबई विद्यापीठाचे अध्यादेश क्र. ५२३१ अन्वये २०१६-१७ साठी प्रवेश परिक्षा घेण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यामध्ये मातृभाषेतून शिक्षण घेणा-या प्रत्येक विद्यार्थ्यांमागे शाळांना प्रोत्साहन अनुदान देण्याच्या योजनेबाबत

(४६) ७२५८४ (०५-०१-२०१७). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोवा राज्यामध्ये मातृभाषेतून शिक्षण घेणा-या प्रत्येक विद्यार्थ्यांमागे ४०० रुपये याप्रमाणे शाळांना प्रोत्साहन अनुदान दिले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठी माध्यमांच्या विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाणात वाढ होत असल्याने राज्यात वरिलप्रमाणे प्रोत्साहन अनुदान योजना लागू करणार आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२०-०४-२०१७) : (१) होय.
(२) राज्यातील मराठी माध्यमाच्या खाजगी अनुदानित शाळांना व स्थानिक स्वराज्य संस्थांना शासनाकडून वेतन व वेतनेतर अनुदान दिले जात असल्याने वेगळे प्रोत्साहन अनुदान योजना लागू करण्यात आलेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे जिल्हासह - राज्याच्या उच्च शिक्षण विभागाकडून करण्यात आलेल्या पटपडताळणीतून अनेक महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांची हजेरी ४० टक्क्याहून कमी असल्याबाबत.

(४७) ७२५९८ (१६-१२-२०१६). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हयासह राज्याच्या उच्च शिक्षण विभागाकडून करण्यात आलेल्या पटपडताळणीतून अनेक महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांची हजेरी ४० टक्क्याहून कमी लावली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे विभागातील सुमारे १३३ अनुदानित महाविद्यालयांपैकी काही महाविद्यालयांच्या प्राचार्यांकडून विद्यार्थांची खोटी हजेरी विद्यापीठाकडे पाठवली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विद्यापीठाच्या नियमानुसार विद्यार्थ्यांची ७५ टक्के हजेरी असल्याशिवाय त्यांना परीक्षेस बसता येत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शिक्षण विभागाच्या वतीने पटपडताळणी पूर्ण झाल्या आहेत काय,
(५) असल्यास, शासनाने विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयातील उपस्थिती बाबत तसेच खोटी हजेरी लावणाऱ्या प्राचार्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलाबांची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१९-०४-२०१७) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) होय.
(४) होय.
(५) परीक्षेस प्रविष्ट होण्याकरीता अनिवार्य उपस्थितीची टक्केवारी तसेच सर्व शैक्षणिक बाबींची खातरजमा केल्यानंतरच संबंधित विद्यार्थ्यांचे अर्ज विद्यापीठाकडे स्विकृत केले जातात.
(६) प्रश्न उद्भवत नाहीत.

राज्यातील इयत्ता आठवी पर्यंत परिक्षा न घेण्याच्या धोरणात बदल करून इयत्ता पाचवी पर्यंत परिक्षा न घेता, विद्यार्थ्यांना वरच्या वर्गात घालण्याचा निर्णय

(४८) ७२६९८ (०५-०१-२०१७). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील इयत्ता आठवी पर्यंत परिक्षा न घेण्याच्या धोरणात बदल करून इयत्ता पाचवी पर्यंत परिक्षा न घेता, विद्यार्थ्यांना वरच्या वर्गात घालण्याचा निर्णय शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत अंतिम निर्णय घेण्याची मुभा केंद्र सरकारने राज्य शासनाला माहे ऑक्टोबर २०१६ मध्ये वा त्यादरम्यान दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२०-०४-२०१७) : (१) व (२) नाही. सदर बाब केंद्र शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक येथे शाळाबाह्य मुले शोधण्यासाठी विकसित केलेल्या ॲप्लिकेशनची निर्मितीबाबत

(४९) ७२८३२ (०५-०१-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे शाळाबाह्य मुले शोधण्यासाठी विकसित केलेल्या ॲप्लिकेशनची निर्मिती करताना शहरात १८ ठिकाणी शाळाबाह्य मुले आढळली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी बज्रेश्वरी नगरमधील सय्यदवाडीत तब्बल २०० मुले शिक्षणापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणी शासनाने येथील शाळाबाह्य मुलांची माहिती संकलित करुन त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२०-०४-२०१७) : (१) होय.

(२) व (३) बज्रेश्वरी नगर परिसरातील सय्यद वस्तीत आढळलेली शाळाबाह्य मुले त्यांच्या सामाजिक व्यवस्थेतील रुढी व पारंपारीक व्यवसाय यामुळे नियमित शाळेत येत नाहीत. या विद्यार्थ्यांना जवळच्या म.न.पा.शाळेत दाखल करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

प्रगत शैक्षणिक कार्यक्रमांतर्गत दुसरी ते आठवी इयत्तांसाठी घेण्यात येणाऱ्या प्रश्नपत्रिकांची विक्री केली जात असल्याबाबत

(५०) ७३२८९ (१६-१२-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शैक्षणिक दृष्टया प्रगत व्हावा यासाठी गत वर्षापासून राज्यभरात सुरु झालेल्या या कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद यंत्रणेच्या देखरेखीखाली इयत्ता २ री ते ८ वी च्या विद्यार्थ्यांकरिता वेगवेगळ्या टप्यावर चाचण्यांचे आयोजन करण्यात येत असून गणित व इंग्रजी या दोन भाषा करीता घेतल्या जाणाऱ्या चाचण्यांमध्ये शासनाचे कोट्यावधी रुपये खर्च होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रगत शैक्षणिक कार्यक्रमांतर्गत दुसरी ते आठवी इयत्तांसाठी घेण्यात येणाऱ्या इंग्रजी व गणित या विषयांच्या चाचण्यांच्या प्रश्नपत्रिका मुंबईत ठिकठिकाणी फोटोकॉपी करणाऱ्या व्यावसायिकांकडे आढळल्या असून त्याच दिवशी विकल्या जात असल्याचे दिनांक २० ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२१-०४-२०१७) :(१) व (२) अशंत खरे आहे.

(३) सदर चाचण्या ह्या स्मृतीवर आधारीत नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.